**महाराष्ट्र शासन**

**कामगार आयुक्त यांचे कार्यालय,**

कामगार भवन, ई- ब्लॉक, सी-२०,वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

**दूरध्वनी क्र** - २६५७३७३३ / २६५७३८६९ **Email** - lcmhdesk10@gmail.com

---

**क्र.**ग्रा.वि./बोनस/संकीर्ण/२०१९/कार्या-१० | ११५५८-११५८० दिनांक : 20 SEP 2019

प्रति,

मा. व्यवस्थापक संचालक,
महानिर्मीती, प्रकाशगड, बांद्रा (पू)
मुंबई – ४०० ०५१.

मा. व्यवस्थापक संचालक
महावितरण, प्रकाशगड, बांद्रा (पू)
मुंबई – ४०० ०५१.

मा. व्यवस्थापक संचालक
महापारेषण, प्रकाशगंगा, बांद्रा (पू)
मुंबई – ४०० ०५१.

**विषय :-बोनस प्रदान अधिनियम, १९६५ अंतर्गत**
सन २०१८-२०१९ चा बोनस रक्कम मिळणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ यांचे दि.१६.०९.२०१९ रोजीचे निवेदन या कार्यालयास प्राप्त झाले असून त्यांनी सन २०१८-२०१९ चा बोनसबाबत मागणी केलेली आहे. सदर पत्राची प्रत सोबत जोडली आहे. कृपया त्याचे अवलोकन व्हावे.

प्रस्तुत प्रकरणी आपणांस कळविण्यात येते की, बोनस प्रदान (सुधारणा) अधिनियम, २०१५ अंतर्गत केंद्र सरकारने दि. ०१.०१.२०१६ च्या अधिसूचनेनुसार कायद्यामध्ये सुधारणा करुन त्या लागू केलेल्या आहेत. सदरहु अधिसूचनेची प्रत सोबत जोडलेली आहे.

तरी, उपरोक्त अधिसूचनेनुसार सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाचा बोनस सर्व कामगारांना देण्याबाबत आपल्या स्तरावरुन संबंधितांना आदेश व्हावेत व त्याचा अनुपालन अहवाल या कार्यालयास पाठवावा, ही विनंती.

आपला विश्वासू

कामगार उप आयुक्त (ग्रा.वि.),
मुंबई यांचेकरीता.

सोबत - वरीलप्रमाणे.

Scanned by CamScanner